नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि.२२/९/२०२६

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
तहकूब सभा परिपत्रक

महिला व बालकल्याण समितीची सभा (बुधवार दि.०९/०९/२०२६ रोजी तहकूब केलेली) मंगळवार, दि.२९/०९/२०२६ रोजी दुपारी ४:०० (चार वाजता) वाजता समिती सभागृह, नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१०, दि. ९/९/२०२६ वरील विषय क्र. १२७ ते विषय क्र.१३३ चा विचार होईल.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्र. ११

महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार,दि.२९/०९/२०२६ रोजी दुपारी ४:०५ (चार वाजून पाच मिनिटे) वाजता समिती सभागृह, नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १३४

मा. सौ.तेजश्री महेश पवळे व मा.श्री.राजेश किसन बराटे यांचे दि.४/९/२०२६ रोजीचे पत्र.

प्रभाग क्र. ३० क मधील विजया बाई शिर्के दवाखान्यासमोरील पुणे महानगरपालिकेने बांधलेले सार्वजनिक शौचालय सद्यस्थितीत जीर्ण व वापरण्या योग्य नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच सदर शौचालयातील महिला विभागाची प्रवेशव्यवस्था योग्य व पुरेशी सुरक्षित नसल्यामुळे महिलांना व विद्यार्थिनींना सदर शौचालयाचा वापर करताना संकोच व अस्वस्थता निर्माण होते. सदर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व क्लासेस असल्याने महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी तसेच नागरिकांची सतत वर्दळ असते.

सदर कामासाठी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यमान जीर्ण शौचालय पाडून त्याठिकाणी महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र, सुरक्षित, स्वच्छ व सुविधायुक्त शौचालय नव्याने बांधल्यास परिसरातील महिला, विद्यार्थिनी, विद्यार्थी व नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होतील.

तरी सदर जीर्ण शौचालय पाडून महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र व योग्य प्रवेश व्यवस्थेसह नवीन शौचालय बांधण्यास मान्यता देण्यात यावी.

<u>विषय क्र. १३५</u>

मा. सौ.तेजश्री महेश पवळे व मा.श्री.राजेश किसन बराटे यांचे दि.४/९/२०२६ रोजीचे पत्र.

मा. स्थायी समितीच्या २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पामध्ये पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी महिलांसाठी स्मार्ट टॉयलेट उभारण्याचा प्रस्ताव मान्य झालेला असून, सदर योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक ३० क वारजे कर्वेनगर – हिंगणे होम कॉलनी मधील पुढील प्रमाणे सार्वजनिक स्मार्ट टॉयलेट करण्यात यावे.

१) मावळे आळी कर्वेनगर, सार्वजनिक शौचालय, पुणे.
२) छत्रपती राजाराम महाराज पूल मातोश्री वृद्धाश्रम शेजारी कर्वेनगर, पुणे.
३) वारजे जकात नाका वारजे जलशुद्धीकरण केंद्र बाहेर बस स्टॉप शेजारी वारजे, पुणे.
४) वनदेवी मंदिर वडाचा बस स्टॉप शेजारी कर्वेनगर, पुणे.
५) आकाश नगर चौक वारजे, पुणे.

<u>विषय क्र. १३६</u>

मा. ऐश्वर्या अतुल पाटील व मा.पूजा जागडे यांचे दि.९/९/२०२६ रोजीचे पत्र.

प्रभागातील महिला व बचत गटांनी उत्पादित केलेल्या हस्तकला, गृहउद्योगाच्या वस्तू व इतर साहित्याला हक्काची बाजारपेठ मिळणे गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक ४ मधील सर्व्हे नं.७, अनुसया पार्क, खराडी येथे महिला व बचत गटांसाठी 'स्त्री आधार विक्री केंद्र' कायमस्वरूपी सुरु करण्यास मंजुरी देण्यात यावी.

<u>विषय क्र. १३७</u>

मा. ऐश्वर्या अतुल पाटील व मा.पूजा जागडे यांचे दि.९/९/२०२६ रोजीचे पत्र.

स्वयंरोजगार अनुदान योजनेतील रक्कमेत वाढ होण्याबाबत:

समाज विकास विभागांतर्गत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत १८ ते ४५ वयोगटातील महिला व पुरुषांना स्वयंरोजगारासाठी र.रुपये ५,००० पर्यंत मिळत आहे ते अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अनुदान वाढवून १०,०००/- रुपये करण्यात यावे.

<u>विषय क्र. १३८</u>

मा. ऐश्वर्या अतुल पाटील व मा.पूजा जागडे यांचे दि.९/९/२०२६ रोजीचे पत्र.

इयत्ता १०वी गुणवत्तावाढ खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य रक्कम वाढवणेबाबत:

समाज विकास विभागाच्या महिला व बालकल्याण योजना व मागास कल्याणकारी योजनेमार्फत इयत्ता ९वी परीक्षेत महापालिका नियम व अटीनुसार गुण मिळविणाऱ्या विद्यार्थास इयत्ता १० मध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी खाजगी क्लाससाठी वार्षिक रक्कम रु ५००० मिळत आहे. ती चालू असलेल्या नियम व अटींनुसार रक्कम वाढवून १०,०००/- रुपये करण्यात यावी.

<u>विषय क्र. १३९</u>

मा. ऐश्वर्या अतुल पाटील व मा.पूजा जागडे यांचे दि.९/९/२०२६ रोजीचे पत्र.

विधवा अनुदान योजना (महिला सक्षमीकरण):

विधवा महिला अर्थसहाय्य योजनेतील अटी शिथिल करणेबाबत महिला व बाल कल्याण विभागांतर्गत राबवल्या जाणाऱ्या 'विधवा महिला अर्थसहाय्य योजना' (एकल माता) मध्ये पतीच्या मृत्यूनंतर २ वर्षे झाल्याची अट तसेच वयाची अट (१८ ते ६५वर्षे) लावण्यात आली आहे. या अटींमुळे अनेक गरजू व पतीच्या निधनानंतर हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या एकल माता या

लाभापासून वंचित राहतात. सदर योजनेचा लाभ सर्व पात्र एकल मातांना मिळण्यासाठी मृत्यूनंतरची २ वर्षाची अट आणि वयाची ६५ वर्षाची अट पूर्णपणे रद्द करण्यात यावी.

विषय क्र. १४०

मा. सौ.अर्चना अमित जगताप व मा.वृषाली कामठे यांचे दि.१६/०९/२०२६ रोजीचे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला, युवक, विद्यार्थी तसेच नागरिकांसाठी विविध कौशल्यविकास, रोजगाराभिमुख व स्वयंरोजगारास उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. सदर प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध विषयांतील प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येते.

सद्यस्थितीत प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांना दोन तासांच्या प्रशिक्षण सत्रासाठी अदा करण्यात येणारे मानधन हे त्यांच्या वेळ, विषयातील तज्ञता व प्रशिक्षणाच्या स्वरूपाच्या तुलनेत अपुरे आहे. त्यामुळे अनुभवी व तज्ञ प्रशिक्षक उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे समाज विकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रशिक्षकांचे दोन तासांच्या प्रशिक्षण सत्राचे मानधन वाढवून रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) करण्यात यावे.

तसेच सदर मानधनवाढीसाठी आवश्यक ती प्रशासकीय व आर्थिक कार्यवाही करून, उपलब्ध तरतुदीनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

मा.महा.आयुक्त यांच्या कडून आलेले पत्र

विषय क्र. १४१

प्रभाग क्र.२८ मधील जनता वसाहत या परिसरातील अस्तित्वातील जीर्ण झालेले शौचालय पाडून नव्याने बांधण्याकरीता मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.३/५८२, दि.०८/०९/२०२६ रोजीचे पत्र.

विषय क्र. १४२

प्रभाग क्र.२२ क काशेवाडी-डायस प्लॉट मधील नुरानी मस्जिद मागील परिसरातील जुने व जीर्ण झालेल्या शौचालय पाडून व नवीन अत्याधुनिक शौचालय उभारणेबाबत मा.सौ.अर्चना तुषार पाटील व मा.ज्योती किशोर गोसावी यांचे दि.०७/०७/२०२६ रोजीच्या पत्रावर झालेला मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ८२,दि.०७/०७/२०२६ ला अनुसरून मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि ५/५८४,दि.०८/०९/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्र. १४३

अलाईड को-ऑप.हौ.सोसा.साळुंखे विहार रोड, पुणे या सोसायटी समोरील पब्लिक टॉयलेट पाडणेस मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/घनव्य/५९६,दि.०९/०९/२०२६ चे पत्र.

योगिता भोसले
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका